उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई यांचे कार्यालय

३०३, अे विंग, ३ रा मजला, बी.एम.सी.गोडाऊन इमारत, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, ठाकूर कॉम्प्लेक्स,
९० फुट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

जा.क्र.: मुंबई/उपनि./आर-दक्षिण वि./ना.रा./२२९७/२०२१
दिनांक : २७/ १२ /२०२१

प्रती,
श्री अरुण शर्मा, मुख्यप्रवर्तक,
नियो. व्हाईसरॉय सावना टॉवर बी को.ऑप.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.८०९/ए/१/१/६ अॅण्ड ८०९/ए/१/१/७,
ठाकुर व्हिलेज रोड, ठाकुर व्हिलेज,
कांदिवली (पूर्व), मंबई ४०० १०१.

विषय : नियो. व्हाईसरॉय सावना टॉवर बी को.ऑप.हौ.सो.लि.,या संस्थेचे नाव राखून ठेवण्याबाबत व बँकेत खाते उघडण्यास परवानगी मिळणेबाबत.

आपले वरील विषयाबाबत दि.24.12.2021 चे पत्राकडे लक्ष वेधण्यात येत असून आपल्या संस्थेचे नाव **नियो. व्हाईसरॉय सावना टॉवर बी को.ऑप.हौ.सो.लि.,** असे राखून ठेवण्यात येत असून आपणास नियोजित संस्थेच्या मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ली. / महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ली. या बँकेत खाते उघडण्यास परवानगी खालील अटीवर देण्यात येत आहे.

१) नाव राखून ठेवण्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या कालावधीत संस्थेचा संपूर्ण नोंदणी प्रस्ताव या कार्यालयाकडे दाखल करावा.

२) सर्व गाळे खरेदी करार भारतीय नोंदणी कायदा १९०८ अनुसार नोंदवून व मुद्रांक शुल्क भरल्याच्या पावत्याच्या सत्यप्रती प्रकरणासोबत जोडाव्यात.

३) नोंदणी प्रकरण तीन महिन्याच्या कालावधीत प्राप्त न झाल्यास नियोजित सहकारी संस्थेचे राखून ठेवलेले नाव रद्द समजण्यात येईल व त्यापुढे रद्द समजण्यात आलेल्या नियोजित संस्थेच्या नावाचा वापर करु नये.

४) काही अपरिहार्य कारणामुळे नियोजित संस्था नोंदणी प्रकरण दाखल करणे शक्य न झाल्यास ३ महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वी नाव राखून ठेवण्यात मुदतवाढीच्या कारणासह प्रत्यक्ष कार्यालयात भेटून सादर करावे .

५) नियोजित संस्थेच्या नावाने मुख्य प्रवर्तक व इतर दोन प्रवर्तक यांच्या एकत्रित सहीने संयुक्त खाते उघडण्यात यावे.

६) नियोजित संस्थेच्या नावाने प्रवर्तकाकडून जमा केलेली सर्व रक्कम संस्थेच्या नावाने उघडण्यात येणाऱ्या खात्यामध्ये ७ दिवसाच्या आत जमा करावी.

७) नियोजित संस्थेची नोंदणी होईपर्यंत अगर संस्थेची नोंदणी न झाल्यास या कार्यालयाच्या पूर्व परवानगीशिवाय बँकेतील रक्कम काढता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

८) संस्था नोंदणी न झाल्यास मुख्य प्रवर्तक यांना या कार्यालयाच्या पूर्व संजुरीने पैसे काढता येतील व त्या पैशाचा वाटप संबंधित सभासदांना या कार्यालयाने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्या समोर करता येईल, मात्र पैसे काढल्यापासून त्यांचे वाटप संबंधितांना एक महिन्यात झाले पाहिजे.

९) या पत्राने खाते उघडण्यास दिलेली परवानगी म्हणजे संस्था नोंदणीसाठी दिलेली हमी नव्हे याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ.सुनिल कोठावळे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई.

प्रत सस्नेह रवाना.
मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ली./ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., शाखा, कांदिवली यांचेकडे माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई.